# गौतम बुद्धांचा मूळ सिद्धांत

**लेखक** : **महापंडित राहुल सांस्कृत्यायन**

**अनुवादक** : **राजरत्न ठोसर**

**website : vinimaypublications.com**

## अनुवादकाचे मनोगत

उत्तर प्रदेशातील जिल्हा आझमगड येथील पन्हादा नावाच्या खेड्यात ता. ९ एप्रिल, १८९३ रोजी राहुलजींचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ पांडे असे होते. बौद्धाधर्म स्विकारल्यापासून त्यांनी राहुल सांस्कृत्यायन हे नाव धारण केले. काठमांडु येथील चौथ्या जागतिक बौद्ध परिषदेला बाबासाहेबांच्या बरोबर ते हजर होते. राहुल सांस्कृत्यायन यांनी आतापर्यंत अनुवादित व संपादित केलेल्या आणि स्वत: लिहिलेल्या ग्रंथांची संख्या सुमारे १२५ आहे व या ग्रंथांची पृष्ठसंख्या ४४ हजार इतकी आहे. दि. १४ एप्रिल, १९६३ रोजी ते कालवश झाले.

या पुस्तकाचा अनुवाद होऊन जवळजवळ सहा महिने झालेली होती. परंतु काही कारणांमुळे हे पुस्तक ६ डिसेंबर, २००८ ला प्रकाशीत होऊ शकले नाही. आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त १४ एप्रिलला पुस्तक प्रकाशीत करत आहोत.

प्रस्तुत पुस्तक हे राहुल सांकृत्यायन यांनी लिहिलेले “बुद्ध के मूल सिद्धांत” या पुस्तकाचा मराठी अनुवाद आहे. बौद्ध साहित्यात राहुलजींचे मोठे योगदान आहे. धम्म समजून घेण्यासाठी व समजावून सांगण्यासाठी हे पुस्तक खऱ्या अर्थाने मार्गदर्शक ठरेल. बुद्धाचा मध्यम मार्ग किंवा बुद्ध धम्म समजून घेण्यासाठी या पुस्तकातील तीन अस्वीकारात्मक व एक स्विकारात्मक सिद्धांत यांना समजावून घेणे गरजेचे आहे.

बाबासाहेब डॉ. आंबेडकरांचे अखेरचे भाषण या पुस्तकाच्या भरघोष यशानंतर “बुद्धाचा मूळ सिद्धांत” हे पुस्तक प्रकाशीत होत आहे. या पुस्तकातील चार सिद्धांतांशिवाय बौद्ध धम्म समजणे कठीण आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आशा आहे वाचकवर्ग या पुस्तकाचे यथोचीत मोठ्या प्रमाणात स्वागत करतील आणि बुद्धाचा धम्म समजून घेऊन आपल्या ह्रदयी ठेवील.

**राजरत्न ठोसर**

# बुद्धाचा मुळ सिद्धांत

बुद्धाचा उपदेश समजण्यास मदत होईल जर वाचक बुद्धाच्या या चार सिद्धांतांना– तीन अस्वीकारात्मक आणि एक स्वीकारात्मक यांना समजून घेईल. ती चार सिद्धांत अशी आहेत–

१) ईश्वर न मानणे; 'मनुष्य स्वतःच स्वतःचा मालक आहे'–या सिद्धांताचा विरोध होईल.

२) आत्मा नित्य नाही असे मानणे; नाहीतर नित्य एक रस मानल्यावर, त्याची परिशुद्धी आणि मुक्तीसाठी योग्यता राहणार नाही.

३) कोणत्याही अन्य गोष्टीला स्वतःप्रमाण मानू नये; नाहीतर बुद्धी आणि अनुभवाची प्रामाणिकता जाईल.

४) जीवन-प्रवाहाला या शरिरापर्यंत परिमीत मानणे; नाहीतर जीवन आणि त्याची विचित्रता कार्य कारण नियमानुसार उत्पन्न न होऊन फक्त आकस्मिक घटना राहतील.

बौद्ध धम्मात या चार गोष्टी सर्वमान्य आहेत. या चार गोष्टींवर आपण येथे अलग-अलग विचार करतो.

# ईश्वर न मानणे

ईश्वरवादी म्हणतात- "प्रत्येक एका कार्याचे कारण असते, म्हणून संसाराचे (जीवनाचे) कारण असले पाहिजे; आणि ते कारण ईश्वर आहे. परंतु असा प्रश्न उपस्थित केला जाऊ शकतो की, ईश्वर कोणत्या प्रकारचा आहे. काय उपादन? कारण, जसे गाडग्याचे कारण माती, कुण्डल चे सोने?

जर ईश्वर जगाचे उपादन (कारण) आहे, तर जग हे ईश्वराचे रूपांतर आहे. मग संसारामध्ये जी चांगले-वाईट, सुख-दुःख, दया क्रूरता पहायला मिळते; ते सर्व ईश्वरामध्ये आहे व ते ईश्वरापासून मिळते. तर मग ईश्वर सुखाची अपेक्षा दुःखमय अधिक आहे, कारण जगात दुःखाचे पारडे जड आहे.

ईश्वर दयाळूपेक्षा क्रूर अधिक आहे, कारण जगात चारही बाजूला क्रूरतेचे राज्य आहे. जरी वनस्पती जीवधारी नाहीत असे मानले, तरी सुक्ष्मजीव ते दृष्टव्य किटाणूंपासून किडे-जीवजंतू, पक्षी, मासे, साप, पाल, गिधाड, लांडगा, सिंह, वाघ, सभ्य-असभ्य मनुष्य इ. सर्व एक दुसऱ्याच्या जीवनाचे ग्राहक आहेत. लक्ष देऊन पाहिले तर दृश्य-अदृश्य हे सारे जग एक अंगावर शहारे उभे करणारे युद्धक्षेत्र आहे, ज्यात अशक्त प्राणी सशक्त प्राण्यांचे अन्न बनत आहेत.

पुनर्जन्म न मानणारे धर्मवाले (नास्तिक) यांना तर हे विना कटकट स्विकारावेच लागेल. पुनर्जन्मवादी म्हणू शकतात की सर्व संकटे पूर्वीच्या कर्माची फळे आहेत, परंतु हे पण चिंतनीय आहे. चांगल्या वाईट कर्माची उत्तरदेही माहितीकारालाच असू शकते. वेडा वा नशीला, बेहोश वा अज्ञान बालक यांना दुसऱ्याच्या हत्येचा दोषी ठरवू शकत नाही. या मताला अमान्यता असू शकते की, मनुष्याच्या व्यतिरिक्त दुसरे प्राणी- जे आपल्या चांगल्या वाईट कर्माला ओळखण्याची समज ठेवत नाही आणि ज्यांचे जीवन दुसऱ्याच्या हत्येवरच अवलंबून आहे, ते आपल्या कर्माला जबाबदार असू शकत नाही. मनुष्यातून सुद्धा बालक, वेडे आदि अलग केल्यावर दया ठेवणाऱ्यांची संख्या खूपच कमी राहील.

जर दुनियेत उत्तरदेही मनुष्यांची संख्या दीड अब्ज मानली तर फळ भोगणारे एवढे सर्व येणार कोठून ज्यांची संख्या अपार आहे. दीड अब्जापेक्षा जास्त तर कासवच असतील जे मनुष्यापेक्षा जास्त दीर्घाजीवी आहेत आणि किटाणू तथा विशालकाय जंतुंच्या बाबतीत तर काय बोलायचं ?

उपादन-कारण आहे, तर निर्विकार कसे असू शकते? जर ईश्वराला निमित्त-कारण मानले अर्थात तो जगाला असे बनवितो की जसे कुंभार घड्याला, सोनार सोन्याला; तर मग प्रश्न उपस्थित होतो की, तो काय विना उपादन-कारणापासून जगाला बनवितो, का उपादन-कारणापासून बनवितो ?

जर विना उपादन-कारणापासून तर अभावापासून भावाची (काहीच नव्हते पासून काहीची) उत्पत्ती मानावी लागेल आणि कार्य-कारणाचा सिद्धांत लुळा पडेल. तर मग जगाला पाहून त्याचं कारण ईश्वर मानण्याची गरज काय ? जर इंद्रजाळासारखे त्याने जगाला विना कारण मायामय उत्पन्न केले आहे तर प्रत्यक्षतः मायामय असल्यावर ईश्वराच्या अस्तित्वाचे अनुमान कोणत्या सामग्रीच्या बळावर होईल ? जर उपादन कारणापासून बनतो, तर कुंभाराची भट्टी अलग राहून बनते की त्यात व्याप्त होऊन? अलग राहून ते सर्वव्यापक राहणार नाही आणि सृष्टी निर्माण करण्यासाठी त्याला दुसऱ्या मदतीवर आणि सांधनांवर अवलंबून रहावे लागेल.

विद्युतकणांपासून शुक्ष्म नवकणांपर्यंत (Neutrons) पोहचविण्यासाठी आणि त्याच्या मिश्रणापासून क्रमशः स्थूलतर वस्तु बनविण्यासाठी तो कोणते हत्यार, सुनाराच्या संडासासारखे प्रयोग करेल आणि मग सर्वशक्तिमान कसा राहिल ? परंतु त्याला उपादन-कारणात सर्वव्यापक मानले तर जे आपण उपादन उपादन-कारणाविना उत्पादन करण्यात अक्षम झाल्यावर तो सर्वशक्तिमान नाही. अशा अवस्थेत पवित्रता, क्रूरता आदि वाईटांचा स्त्रोत होण्याचा तो दोषी होईल.

अशा प्रकारे तो उपादन-कारण होऊन शकत नाही, ना निमित्त कारण. जगाचे दुसरे कोणते कारण असायला पाहिजे हे काही गरजेचे नाही. जर त्याचे कारण कोण, त्याचे कारण कोण? असे विचारल्यावर जगातील कोणती सुक्ष्मतम वस्तू त्याच्या विशेष शक्तिवर केले नाही (कारण), तर ईश्वरापर्यंतच का थांबेल ? का जर ईश्वराचे पण दुसरे कारण मानले जाईल ? अशाप्रकारे ईश्वराचे दुसरे कारण मानणे युक्तियुक्त नाही.

कर्ता-धर्ता ईश्वर असल्यावर, मनुष्य त्याच्या हातातील बाहुली आहे; नंतर तो कोणत्या चांगल्या-वाईट कामासाठी जबाबदार असू शकत नाही. पुन्हा दुनियेत त्याचे सतवले जाणे हे काय ईश्वराच्या दयाळूपणाचे द्योतक आहे ?

ईश्वर सृष्टिकर्ता आहे असे मानणे देखील बरोबर नाही. जर सृष्टि अनादि आहे, तर तिला कोणत्याही कर्त्याची गरज नाही; कारण कर्ता होण्यासाठी तिला कार्याच्या अगोदर उपस्थित रहावे लागेल. जर सृष्टि आदि आहे, तर कोटी दोन कोटी, अबर दोन अरब वर्षच नाही, अचिंत्य अनंत वर्षांपासून सृष्टि उत्पन्न होण्याच्या त्या क्रियारहित ईश्वर असण्याचे प्रमाण काय ? क्रियाच तर त्याच्या अस्तित्वामध्ये प्रमाण होऊ शकते.

ईश्वराला मानल्यावर, जसे की प्रथम सांगितले आहे, मनुष्याला त्याच्या अधीन व्हावे लागेल, तेव्हा मनुष्य स्वतः स्वतःचा स्वामी आहे, जसे वाटेल तसे आपल्याला बनवू शकतो- हे मानले जाऊ शकत नाही. तरी पण मनुष्याला शुद्धी आणि मुक्तीसाठी प्रयत्न करण्याची गरजच काय ? तर मग धर्माने सांगितलेले रस्ते आणि धर्म पण निष्फळ.

ईश्वराला मानल्यावर मनुष्य जो काही वर्तमानात आहे, तो आपल्याच कर्मापासून आणि जो भविष्यात असेल, तो पण आपल्याच करणीपासून. मनुष्याची काम करण्याची स्वतंत्रता  असल्यावरच धर्माने सांगितलेल्या रस्त्यावर धर्माची सार्थकता होऊ शकते. ईश्वरवादींद्वारा सहस्त्राब्दियांपासून धर्मासाठी अशांती आणि रक्ताचे पाट वाहू लागले आहेत, तर मग ईश्वर का नाही बघून घेत ?  वस्तुतः ईश्वर मनुष्याची मानसिक सृष्टि आहे.

## आत्मा नित्य न मानणे

येथे प्रथम आपल्याला हे समजून घ्यायचे आहे की बौद्ध अनात्माला कसे मानतात. बुद्धाच्या काळी ब्राम्हण, परिव्राजक किंवा दुसऱ्या मतांचे आचार्य मानत होते की, शरिराजवळ आणि शरीराच्या भिन्न एक चेतन शक्ती आहे जिच्या आगमनामुळे शरीरात उष्णता आणि ज्ञानपूर्वक कार्यपद्धती पहायला मिळेल. जेव्हा ते शरीर सोडून कर्मानुसार शरीरान्तर जाऊ लागते; जे शरीर शीतल, प्रयत्नविरहित होते. अशा नित्य चेतन शक्तीला ते आत्मा म्हणत होते. सामीय (semitic) धर्माचेही पुनर्जन्म सोडून हेच मत आहे. त्यांच्या शिवाय बुद्धाच्या समयी दुसरे पण आचार्य होते ज्यांचे म्हणणे होते की, शरीराहून वेगळी आत्मा कोणती वस्तू नाही.

शरीरात भिन्न भिन्न परिणामात रसांच्या कारण उष्णता आणि हालचाल तयार होते, रसांच्या परिणामात कमीवेशी झाल्यावर ती जाते. अशाप्रकारे आत्मा शरीरापासून कोणती वेगळी वस्तू नाही. बुद्धाने आणखी एक 'आत्मा विनाश पावणे' - या दोन्ही गोष्टींना सोडून मध्यम मार्ग स्वीकारला. त्यांनी सांगितले की, आत्मा कोणती नित्य कुटस्थ वस्तू नाही, तर काही खास कारणांनी स्कंधांच्या (भूत, मन) योगापासून एक उत्पन्न शक्ती आहे, जी अन्य बाह्य भुतांसारखी क्षणोक्षण उत्पन्न होणे आणि विलीन झाल्यावरही चित्ताचा प्रवाह जोपर्यंत या शरिरात असतो, तोपर्यंत शरीराला सजीव म्हटले जाते. आपल्या अध्यात्म-परिवर्तन आणि शरीर परिवर्तनात बहुतेक समानता आहे.

आपले शरीर क्षणा-क्षणाला बदलत आहे. "चाळीस वर्षाचे हे शरीर तेच नाही जे पाच वर्ष आणि वीस वर्षाच्या अवस्थेत होते आणि साठव्या वर्षातही ते असेच राहणार नाही." एक-एक अणू, ज्यापासून आपले शरीर बनले आहे, प्रतिक्षण आपले स्थान, नवउत्पत्तीसाठी खाली करत आहे. असे असल्यावरही प्रत्येक विगत शरीर निर्मापक परमाणूचा उत्तराधिकारी बहुतेक गोष्टींमध्ये सदृश्य होत आहे.

अशा प्रकारे अद्यापहि आपले पहिल्या वर्षी असणारे शरीर दहाव्या वर्षी राहत नाही आणि विसाव्या वर्षी दहाव्या वर्षाचेही शरीर संपून जावू लागते, तरीही सदृश्य परिवर्तनामुळे मोठ्या असणाऱ्या शरीराला आपण एकच म्हणतो. या प्रकारे आत्माही क्षणा-क्षणाला बदलत आहे., परंतु सदृश्य परिवर्तनाच्या कारण त्याला एक म्हटले जाते. तुम्ही आता तुमच्याच जीवनात पहा.

दोन वर्षापूर्वी तुम्हाला लांबूनच सिगारेटचा धूर नकोसा होता आणि आता खुशाल पिता. दोन वर्षापूर्वी स्वतः पक्षांना मारून त्यांचे फडफडणे पाहणे तुम्हाला मनोरंजक गोष्ट होती. परंतु आता तुम्ही दुसऱ्याने मारलेल्या पक्षाला फडफडत असलेले पाहून स्वतः फडफडू लागता. जर तुम्हाला तुमचे झुकलेले मन आणि त्याच्या प्रवृत्तीला पाहून लिहून ठेवण्याचा अभ्यास आहे, तर तुमची मागील दहा वर्षापूर्वीची डायरी काढून वाचा, तेथे तुम्हाला कित्येक विचार असे मिळतील ज्यांना दहा वर्षापूर्वी तुम्ही आपले म्हणत होता; परंतु दहा वर्षानंतर जर आज कोणी तुमच्याच शब्दात

तुमच्या पूर्व विचारांना तुमच्या समोर ठेवले तर तुम्ही साफ नकार द्याल की हे 'विचार माझे नाहीत, माझे विचार कधी असे नव्हते.' वस्तुतः तुमचे हे म्हणणे ठीक आहे, कारण तुमच्या मागील दहा वर्षांच्या अनुभवांनी तुम्हाला बदललेले आहे.

तुम्ही असे म्हणू शकता की, मन बदलते आत्मा थोडीच बदलते. आमचे म्हणणे आहे की मनाहून वेगळी आत्मा कोणती वस्तू नाही. चित्त विज्ञान आणि आत्मा एकच वस्तू आहे. ज्याप्रकारे चक्षू, श्रोत्र, प्राण, जिव्हा आणि त्वक इंद्रियांचा आपण प्रत्यक्ष अनुभव करतो, तसे मनाचे नाही. आपल्याला मनाची सत्ता का स्विकारावी लागते? डोळे चिंचेला पाहतात आणि जिभेतून पाणी टपकते. नाक दुर्गंधीचा वास घेते आणि हात नाकावर पोहचतो. तुम्ही पाहता, डोळे आणि जिभ एक नाही. नाही ते एक दुसऱ्याला मिळालेत. यामुळे या दोघांना मिळविण्यासाठी एक तिसरे इंद्रिय पाहिजे, आणि ते आहे मन. पाच ही इंद्रिय आपापल्या ज्ञानाला जेथे पोहचवितात आणि जेथून शरिरातील भिन्न भिन्न अवयवांना गतीचे अनुशासन मिळते, ते मन आहे. तेच ग्रहण चिंतन आणि निर्णय करते. ते ग्रहण आदि कसे करतो? फौजेच्या कमाण्डरसारखे वेगळे राहून नाही, तर जसे पाच ट्युबमध्ये लाल, पिवळा, हिरवा, निळा, आणि काळा या रंगांचे चूर्ण पडले आहे आणि खाली एक अशा काचेच्या नळीतून पाणी वाहत आहे ज्यात पाचही ट्युबांचे तोंडे मिळालेली आहेत आणि ट्युबांचे तोंड क्रमवारीने खोलत आहे. ज्या वेळी जो रंग पाण्यावर पडले, पाणी त्याच रंगाचे होईल.

अशा प्रकारे डोळे काळ्या सापाकडे लागतात, तेव्हा आपल्याला काळ्या सापाचे दर्शन होते. पुन्हा हे ज्ञान पटकन मनात जाते. त्या वेळचे मन, जे आपल्या कारणभूत जुन्या मनांच्या अनुभवांचे बीज आपल्यात ठेवतो, या नव्या ज्ञानरूपी चूर्ण पडल्याचे पाहून आपल्याला थांबायचे तरीही हालवून सोडलेल्या चाकासारखे काही क्षणापर्यंत एक-एकाच्या नंतर उत्पन्न होणारे मन त्या रंगात रंगून जाईल; यद्यापि प्रत्येक दुसऱ्या क्षणाच्या मनावर त्याचा परिणाम फिकट पडत जाईल आणि जर साप काही वेळापर्यंत दिसत राहील आणि तुमच्याकडे येत राहील. क्षणा-क्षणाला उत्पन्न होणाऱ्या मनावर भयाचे संचार अधिक होऊ लागेल. जी गोष्ट भयप्रद विषयांच्या बाबतीत आहे, तीच प्रीतीप्रद तथा दुसऱ्या विषयांच्या बाबतीतही समजली पाहिजे.

अस्तू, शेवटी उक्त कारणापासून चक्षू आदि इंद्रियांच्या अतिरिक्त आपल्याला त्यांच्या संयोजक एका इंद्रियाला मानण्याची गरज पडते ज्याला 'मन' म्हणतात. याच्याहून वेगळी आत्म्याची काय आवश्यकता? जर असे म्हणून जुन्या अनुभवांना आठवणीच्या स्वरूपात ठेवण्यासाठी, कारण मन तर क्षणिक आहे (ही गोष्ट ज्यांचे मन क्षणिक नाही ते म्हणू शकत नाही) तेव्हा आपण म्हणू- मन क्षणिक आहे, परंतु ते आपल्या परवर्ती मनाचे पण कारण आहे. अनुवांशिक नियमानुसार, जसे आई-वडिलांच्या बहुतेक गोष्टी मुलात येतात, त्याचप्रकारे पूर्वीचे मन अनुभवांचे बीज वा संस्कार मागच्या मनासाठी वसीयत (वारस) मध्ये सोडून जाते आणि तेच स्मृतीचे कारण आहे. वस्तुतः संस्काराचा ठप्पा तर क्षणिक वस्तुंवरच लागू शकतो. आत्माला जर कुटस्थ नित्य मानले तर ते खूप काळापर्यंत एकरस राहण्यासाठी होईल. भलेही, सदासाठी राहणाऱ्या आत्मावर अनुभवांचा ठप्पा कसा पडू शकतो?

जर पडू शकतो, तर ठप्पा पडल्याबरोबरच त्याचे रूप-परिवर्तन होईल. आत्मा कोणता जड पदार्थ नाही, ज्याच्या फक्त बाह्य अवयवांवर लांछन लागेल. ते तर चेतनमय आहे, यासाठी अशा अवस्थेत इंद्रियजनित ज्ञान त्यात सर्वत्र प्रविष्ठ होईल. मग ते राग, द्वेष, मोह अशा विविध प्रकारांमधून कोणत्या तरी एका प्रकारचे होईल. तर मग ते ती आत्मा असू शकत नाही जी ठप्पा लागण्याच्या अगोदर होती. अंततः ती एकरस पण होऊ शकत नाही. मग आत्मा

नित्य आहे- कसे? जर थोड्या वेळासाठी मानू की ठप्पा लागतो, तर ते अभौतिक संस्कार पण नित्य आत्म्यामध्ये जाऊन अविचल होईल. तर मग शुद्धी आणि मुक्तीची आशा कशी केली जाऊ शकते?

जर असे म्हणू- आत्मा कोणती नित्य नाही, तर मनाच्या क्षणिक होण्यावर, शरिर नष्ट झाल्यावर चांगल्या-वाईट कर्मांचा विपाक कसा होईल? येथे प्रथम हे समजावून घ्या की बौद्ध विपाक कसे मानतात. ते हे मानत नाही की, आपण जे चांगले-वाईट काम करतो, ते लिहिण्यासाठी ईश्वराने आपल्या मागे एक दूत लेखक ठेवला आहे.

आपण चांगले वा वाईट कोणतेही कायिक वाचिक कर्म करतो, सगळ्या कर्माचे उगम आपले मन आहे. अंतः द्वेषमुक्त काम करण्यासाठी मनाला द्वेषयुक्त बनावे लागते; रागयुक्त काम करण्यासाठी मनाला रागयुक्त बनावे लागते. मनाच्या त्या बनावटीची, त्या ध्वनीची गुंज तोपर्यंत राहते की जोपर्यंत विरोधी ध्वनीपासून येऊन धडकून नष्ट होत नाही. माणूस एका दिवसात क्रुर बनू शकत नाही. ऑपरेशनच्या डॉक्टरला पण हळूहळू आपल्या मनाला स्थिर करावे लागते, मग तेथे खुन्याची तर गोष्टच काय?

जेव्हा कोणत्या असहाय्य निरापराध मुलीला मार खाताना पाहून दर्शकाचे मत प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही (ते दुसऱ्या भाषेत- करूणेकडे), तर स्वतः मारणाऱ्याचे मन कडक झाल्याशिवाय कसे राहील? अंतः आपण जे काम करतो त्याचा परिणाम तात्काळ मनावर पडतो. जितके मन कडक होत जाते, तितकेच त्याच्यात सुक्ष्म मानसिक चिंतन आणि विकासाची योग्यता कमी होत जाते.

चांगले-वाईट मनोभाव संपत्ती आणि कर्जासारखे आहेत. जर संपत्तीचा साठा अधिक जड असला, कर्जाचा कमी तर संपत्तीचे पारडे जड राहील. हा हिशोब मनाच्या क्षण-क्षण रूपात स्वतः होत असतो. येथे हिशोबाची टोटल महिने, हप्ते, दिवस नाही तर लगेच होत असतो. मनुष्य काय आहे, आपल्या मागील चांगल्या-वाईट अनुभवांचा पूर्ण योग दुसऱ्या क्षणी उत्पन्न होणाऱ्या मनाला बहुतेक गोष्टी आपल्या जनक मनापासून भेट या स्वरूपात मिळते. ह्या भेटीचा ठेवा आपल्या लहानपणापासून वृद्धावस्थेपर्यंत राहतो - याला समजण्यास अडचण होणार नाही.

परंतु बुद्धाच्या शिकवणीनुसार हा ठेवा जन्माच्या अगोदर पण होता आणि मृत्यूनंतरही राहील. आपल्या मागील अनुभवांपासून बनलेल्या मनाची उपमा, मृत्यू-क्षणात ज्या वेळेला ते या शरीराला सोडण्यासाठी तयार असते, त्या तप्त लोहधारापासून दिली जाऊ शकते जी एका नळीच्या आधारे खाली वाहत येत आहे जी एका टीलापासून येऊन थांबते. त्या टीलाच्या दुसऱ्या बाजूला एक अशी दुसरी नाली आहे जिच्या आरंभी पर्याप्त चुंबक राशी आहे, तर खरच त्या धारेला नाल्यात टाकण्यासाठी सर्वत्र राहील. अशाप्रकारे मृत्यूच्या वेळी चित्त-प्रवाह आपल्या संस्कार राशी बरोबर या जीवनाच्या टोकाला उभा राहतो. ते संस्कार-राशी रूपी चुंबक समान धर्म असणाऱ्या समीपतम शरीरात ओढून परत त्याची तिच जुनी कार्यवाही सुरू करते. हा क्रम तोपर्यंत असतो जोपर्यंत तृष्णाच्या क्षयापासून जर संतती विश्रृंखलित असेल तर निवार्णाला प्राप्त होत नाही. अशाप्रकारे कर्म, कर्मफळ आणि जन्मांतर असते.

'जीवा'ला नित्य मानण्यात खूप दोष आहेत. जर तुम्ही त्याला नित्य मानता तर त्याला फक्त अमरच नाही, तर आजन्म मानावे लागेल. मग सामीय धर्मात पण जेथे पुनर्जन्म मानत नाहीत तेथे हे मानावे लागेल की, जीव अरब-अरब वर्ष नाही, तर अनादिकाळापासून आजपर्यंत चुपचाप निश्चेष्ट पडलेला आहे. आता एक, पन्नास वा शंभर वर्षासाठी विना कोणत्या पुर्वकर्मानुसार, या दुनियेत जन्मांध वा नेत्रवान, जन्मरोगी वा स्वस्थ, मंदबुद्धी वा प्रतिभाशाली

बनून उत्पन्न झाले आहे आणि मेल्यानंतर पुन्हा अनंत काळसाठी आपल्या काही वर्षांच्या चांगल्या-वाईट कर्मांच्या कारण स्वर्ग वा नरकात टाकला जाईल. काय अशा प्रकारची नित्यता बुद्धीयुक्त मानली जाऊ शकेल?

जे लोक पुनर्जन्म मानतात आणि सोबत-सोबत आत्म्याला नित्य पण; त्यांची त्या दोन्ही गोष्टी परस्पर विरोधी आहेत. जेव्हा ते नित्य कुटस्थ आहे अर्थात सदा एकरस राहील; मग अशा एकरस वस्तूला जर परिशुद्ध मानतात तर ती जन्म मरणाच्या फेऱ्यात कशी पडू शकते? जर अशुद्ध आहे तर स्वभावतः अशुद्ध असल्यावर त्याची मुक्ती कशी होऊ शकते? नित्य कुटस्थ असल्यावर संस्काराची छाप पडू शकत नाही, हे आम्ही प्रथम सांगितले आहेच. जर छापासाठी मनाला मानतात, तर आत्म्याला मानण्याची गरजच काय राहते?

असा प्रश्न होऊ शकतो की, जर मन तथा आत्मा एक आहे आणि ती क्षणिक आहे तर अनेकात – मी प्रथम होतो, मी आता आहे – अशा एकतेचे भान का होते? याचे उत्तर आहे की समुदायात एकत्वाची बुद्धी दुनियातील सार्वभौमिक नियम आहे. आपण संसारातील कोणत्याही वस्तूला घेऊ. सर्व हजारो अणूंपासून बनलेले आहे ज्याच्यामध्ये भरपूर अंतर आहे. ही गोष्ट लोह, प्लेटिनम, हिरे अशा सर्व ठोसच्या ठोस वस्तूंची आहे. जर आपली दृष्टी उत्तम सुक्ष्म असती तर आपण त्याला असेच अलग अलग पाहत असतो. जसे जवळ गेल्यावर जंगलातील वृक्ष.

अशाप्रकारे दुनियेत सर्व दृश्य पदार्थ्यांच्या मुळात अनेकता असल्यावरही एकताचा व्यवहार केला जातो. अगणित तुकड्यांपासून बनलेल्या जंगलाला एक जंगल म्हणतो. अनके वृक्षांपासून बनलेल्या जंगलाला एक जंगल म्हणतो. अनेक ताऱ्यांच्या तुकड्यांना पाहून एक तारा म्हणतो. हा! एक फरक नक्कीच आहे. येथे शरिर, वन, तारे यात अंशी आणि अंश एका काळात आणि एका देशात अस्तित्वात राहतात, तेथे मन प्रतिक्षण एकानंतर एक उत्पन्न होत राहते.

याच्यासाठी चांगले उदाहरण वीजनिर्मीती, चालती पवनचक्की किंवा विजेवर चालणाऱ्या पंख्याला घेऊ शकता. वीजनिर्मीतीचा प्रकाश किंवा पंख्याच्या पाती लवकर लवकर इतक्या सूक्ष्म वेळात एका जागेवरून दुसऱ्या जागेवर पोहचतात की आपण त्याला ग्रहण करू शकत नाही आणि काळ एक स्वतंत्र बनून त्याला चक्राच्या रूपात आणून सोडते. अशाप्रकारे मन पण इतक्या लवकर आपल्या जागेवर दुसऱ्या मनाला उपस्थित करत आहे की, त्यामधील वेळेला आपण ग्रहण करू शकत नाही आणि आपल्याला चक्राच्या एकतेचे भान व्हायला लागते. नदीच्या प्रवाहाला पण तुम्ही एक म्हणता, परंतु काय ते पाणी हजारो थेंबापासून आणि थेंब अगणित उद्रजन ओषजनाच्या परमाणूंपासून आणि परमाणू अनेक धन-ऋण विद्युत कणांपासून (ज्याच्यामध्ये फेरी मारण्यासाठी भरपूर अंतर आहे.) आणि परत सूक्ष्मतम अनेक न्यूट्रानांपासून बनले नाही काय?

वस्तुतः संसारात सर्व ठिकाणी समुदायालाच एक म्हटले जात आहे. जोपर्यंत आपल्या भाषाचा हा सार्वभौमिक प्रयोग आहे, तोपर्यंत क्षणिक मनाच्या संतती ( ? ? प्रवाह) ला सामान्य दृष्टीने आपण एक म्हणालो तर आश्चर्य काय आहे? आश्चर्य तर हे आहे की साऱ्या दुनियेत एक म्हटल्या जाणाऱ्या वस्तूंला समुहित पाहूनही विचारतात की समुहित एक आहे, तर आत्मा का एक म्हटली जाते? प्रश्न होऊ शकतो जर आत्मा क्षणिक आहे, दुसऱ्या क्षणी ते राहतच नाही त्याची पुर्णता आणि परिशुद्धी कशी?

उत्तर हे आहे की, आपण मनाला क्षणिक मानूनही मनाच्या संतती (प्रवाह) ला क्षणिक मानत नाही. गंगेचे पाणी, त्याचा आधार, दोन्ही कुल आणि वाळू सर्व बरोबर बदलत आहेत, तरी पण सर्वांचा प्रवाह बनून राहतो ज्याला आपण एक मन गंगा म्हणतो. अशा चित्त-संततीची परिशुद्धी आणि पूर्णता करावी लागते. जेवढी चित्त-संतती राग, द्वेष, मोह या मुळापासून मुक्त होत जाते, तेवढेच त्या पुरूषाचे कायीक, वाचिक, मानसिक कर्म परिशुद्ध होत जातात. ज्याच्या फळस्वरूप तो व्यक्ती आपल्या-परक्याला अपकार करण्यास समर्थ राहतो. जेव्हा त्यात रोग-द्वेषाचे कुटूंब, गाव, देश, भूमी, प्राणीमात्राच्या स्वार्थाला आपले बनविणे, आपल्या परिधीला शेवटपर्यंत पोहचवून देते. त्यावेळी अनंत परिधीवाली तृष्णा बंधरहीत ती तृष्णाच राहत नाही, त्या पुरूषासाठी निर्वाणाचा मार्ग अन्मुक्त होत जातो आणि तो दु:खाच्या विळख्यापासून सुटून जातो. मुक्तीपर्यंत पोहचण्यासाठी पुरूषाला जवळच्या स्वार्थ सीमा पार करून लोकहितार्थ सर्व काही उत्सर्ग करावे लागते. (तुम्ही जातकच्या सुंदर गोष्टींमध्ये पहाल की, पूर्णतेसाठी बोधीसत्वाला किती उत्सर्ग (त्याग) करावा लागतो.) तृष्णेला सोडणे म्हणजे दु:खाच्या मार्गाला थांबविणे, कारण दुनियेत अधिकतर दु:ख  तृष्णा आणि स्वार्थामुळे तर आहे?

अशाप्रकारे मनाच्या क्षणिक होण्यावर, कारण चित्त-संतती क्षणिक नाही, यासाठी त्याची पुर्णता आणि परिशुद्धी करावी लागते. वस्तुत: जर आत्म्याला नित्य कुटस्थ आत्मा न मानून, त्याच्या स्थानावर क्षण-क्षण उत्पन्न होणाऱ्या चित्ताच्या संतती (प्रवाह) ला मानले तर शब्दावर आमचा काही आग्रह नाही. कारण "आत्म" शब्द नित्य चेतनसाठी व्यवह्रत- होत होता. यासाठी बुद्धाने "अन् आत्म" - शब्दाचा प्रयोग केला.

## कोणत्याही ग्रंथाला स्वत: प्रमाण न मानणे

स्व:प्रमाण असण्याचा दावा करणारा फक्त एक ग्रंथ नाही. सर्व धर्मवाले आपापल्या ग्रंथाला स्वत:प्रमाण मानतात आणि मानून (दुसऱ्याकडून वदवून) घेण्याचा प्रयत्न करतात. ब्राम्हण वेदाला स्वत:प्रमाण मानतात. ज्याच्या बहुतेक गोष्टी अन्य धर्मवाल्यांच्या पुस्तक किंवा विज्ञानाच्या कित्येक प्रयोगाद्वारा सिद्ध गोष्टींच्या विरूद्ध पडतात. तरीही असा ग्रंथ स्वत:प्रमाण कसा मानला जाऊ शकतो? जर म्हणाल की वेद विज्ञानाच्या प्रयोग सिद्ध सिद्धांताच्या विरूद्ध नाही, तर मग प्रश्न होईल - हे कसे माहित? त्याच्या सिद्धीसाठी शेवटी बुद्धीचा आश्रय घ्यावा लागेल. मग काय यातून हे सिद्ध होत नाही का की, वेदाची प्रामाणिकता बुद्धीवर निर्भर आहे. तर मग वेदाची अपेक्षा बुद्धीच स्वत: प्रमाण झाली. ज्या गोष्टी येथे वेदाच्या बाबतीत सांगितल्या गेल्या, त्या बायबल, अंजील, कुराण आदि स्वत: प्रमाण मानल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या बाबतीतही समजली पाहिजे. वस्तुत: जेव्हा ईश्वरच नाही, तर ईश्वराचे अस्तीत्व कसे असेल?

पुस्तकांना स्वत: प्रमाण मानल्यापासून जगात किती भयंकर अत्याचार झालेत. गेलेलियोची ती दुर्गती नसती झाली जर बायबला स्वत: प्रमाण मानले नसते. आणखी कितीतरी वैज्ञानिकांना प्राणाला मुकावे लागले नसते जर बायबलला स्वत: प्रमाण मानले नसते. यवन तत्ववेत्यांचे सहस्त्रहित्वे परिश्रम ग्रंथ रूपात ज्या सिकंदरियाच्या पुस्तकालयात सुरक्षित होते; तर त्यांना जळून राख केले गेले नसते, जर मुसलमान विजेत्यांनी कुराणाला स्वत: प्रमाण मानले नसते. कोणत्याही ग्रंथाला स्वत: प्रमाण मानणे असहिष्णुतेचे कारण बनले, यात दुनियात हजारो वर्षांपासून मनुष्य जातीला धर्मांधता, मिथ्या विश्वास आणि मानसिक छळात पडून रहावे लागले नाही, तर याने ज्ञानाच्या प्रसारात अडचणी निर्माण करण्याबरोबर रक्तानेही धरतीला रंगण्यास मदत केली आहे. ईसाई धर्म युद्ध काय होते? तर बायबल आणि कुराण हे स्वत: प्रमाण असण्याच्या भांडणाचा परिणाम.

कोणत्याही ग्रंथाला स्वतः प्रमाण मानणे, म्हणजे यात वर्णन केलेल्या विषयावर संशय न करून पुढील जिज्ञासेला थांबविणे. जिज्ञासा दुनियातील मोठ-मोठ्या वैज्ञानिक अविष्कार करण्यामुळे झाली आहे. जर गॅलेलिओने बायबलच्या म्हणण्यानुसार पृथ्वीला सपाट मानले असते, तर त्याला पृथ्वीच्या गोल असण्याच्या प्रमाणांचे भान झाले नसते. जर केप्लरने बायबलच्या सूर्यभ्रमणाचा सिद्धांत मानला असता, तर पृथ्वीच्या फिरण्याच्या आपल्या तीन नियमांना कोठून संशोधन केले असते? वस्तुतः ग्रंथाच्या स्वतः प्रमाण मानण्यावर न्युटनला गुरूत्वाकर्षणाचा शोध नसता लागला आणि ना ही आईस्टाइनने त्याच्या संशोधक सापेक्षततेच्या महान सिद्धांताचे संशोधन केले असते. वस्तुतः संसारात विद्या, सभ्यता संबंधी जेवढी प्रगती झाली आहे, ती ग्रंथाच्या स्वतः प्रमाणाच्या नसण्यावरून झाली आहे.

व्यवहारात कोणता मनुष्य आपल्या धर्माची प्रामाणिकता मानतो? ग्रंथ आपापल्या काळच्या रुढी, अंधविश्वास आणि अज्ञानांनी जखडून गेलेले असतात. ते आपल्या काळच्या धार्मिक, सामाजिक किंवा राजनैतीक व्यवहारांचे पारितोषीक असतात. सहस्त्रब्दियानंतर या गोष्टी मृत पावलेल्या राहतात, तरीपण ते मृत मढ्याला गळ्यात बांधू पाहतात. सेन्ट पालच्या वेळी स्त्रियांच्या डोक्यावर पदर घेणे किंवा डोके झाकणे त्यावेळच्या फॅशननुसार चांगले समजले जात असेल. परंतु त्या लिहिण्याच्या कारण आज युरोपियन स्त्रियांना गिरजे आणि न्यायालयात शपथ घेण्याच्या वेळी टोपी घालण्याला का मजबूर केले जाते, जेव्हा की दुसऱ्या जागी समाज त्याची आवश्यकता समजत नाही?

ग्रंथाच्या स्वतः प्रमाण असण्यासाठी त्याच्या कर्त्याला सर्वज्ञ मानावे लागेल – सर्वज्ञ पण सर्व देश, सर्व काळ, सर्व वस्तूंच्या संबंधात. तरी पण कोणी सर्वज्ञ आपल्या जन्माच्या हजार वर्षेपुर्व आपल्याद्वारा केल्या जाणाऱ्या चांगले-वाईट सर्व कर्मांना ओळखत होता, तर मग आज आपण तसे करण्यावर मजबूर आहे, अन्यथा त्याची सर्वज्ञता खोटी ठरेल. तर मनुष्य असल्या सर्वज्ञाच्या हातातील बाहुली मात्र नाही काय? मग बाहुलीला आपल्यासाठी चांगले-वाईट काम निवडण्याचे आणि करण्याचा काय अधिकार? आणि तेव्हा असले धर्म, त्यांचे ग्रंथ आणि त्यात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे प्रयोजन काय?

परिशुद्ध आणि मुक्त बनण्यासाठी कर्म करण्यावर मनुष्याचे स्वतंत्र होणे जरूरी आहे. कर्म करण्याच्या स्वतंत्रतासाठी बुद्धीचे स्वतंत्र होणे जरूरी आहे. बुद्धी स्वातंत्र्यासाठी कोणत्याही ग्रंथाची पारतंत्रता न होणे आवश्यक आहे. वस्तुतः कोणत्या ग्रंथाची प्रामाणिकता त्याच्या बुद्धीपुर्वक होण्यावर निर्भर आहे, नाही की बुद्धीची प्रामाणिकता ग्रंथावर आहे.

उक्त तीन अस्वीकारात्मक गोष्टी आहेत ज्याला बुद्ध धम्म मानतो.

## जीवन प्रवाहाला या शरिरापुर्वी आणि नंतर मानणे

मुलाच्या उत्पत्तीपासून त्याच्या जीवनाची सुरुवात होते. मुल काय आहे? शरीर आणि मनाचा समुदाय. शरिर ही कोणी एक नाही, तर एका काळातही असंख्य अणुंचा समुदाय आहे. हे अणु प्रत्येक क्षण बदलत राहतात आणि त्यांच्या जागी त्यांच्यासारखे दुसरे अणु उत्पन्न होत आहेत. अशाप्रकारे क्षणा-क्षणाला शरिरात परिवर्तन होत आहे. काही वर्षानंतर वस्तुतः तेच शरिर राहत नाही. परंतु परिवर्तन सदृश्य परमाणुंद्वारा होते, म्हणून आपण म्हणतो - ते शरिर तेच आहे. जी गोष्ट येथे शरिराची आहे ती मनावरही लागू होते. फरक हाच की मन सुक्ष्म आहे, त्याचे परिवर्तनही शुक्ष्म आहे आणि पुर्वीच्या रुपांचे भेदही शुक्ष्म आहे. म्हणून त्या भेदाला समजणे कठीण आहे. आत्मा आणि मन एकच आहे आणि क्षण-क्षण बदलत आहे, असे आपण दुसऱ्या ठिकाणी म्हणत आलो आहोत.

शरिर आणि मन (आत्मा) दोन्ही बदलत आहेत. कोणत्याही क्षणातील मुलाच्या जीवनाला घ्या. तो पुर्वीच्या जीवनांशाच्या प्रभावाहून प्रभावित मिळेल. क, ख शिकण्यापासून मधल्या श्रेणीत होत असलेला, जेथे त्यांच्या पुर्ववर्ती अवस्थेचा परिणाम आहे, तेथे आपण कोणत्याही मधल्या कडीला सोडू शकत नाही. मॅट्रीक पास केल्याशिवाय कसे काय कोणी एम.ए. पर्यंत पोहचू शकेल. अशाप्रकारे कार्य - कारण शृंखला जन्मापासून मरणापर्यंत मजबूत दिसून येते, प्रश्न असा की, जर जीवन इतक्या दोन क्षणापर्यंत कार्य-कारण संबंधावर अवलंबीत माहिती होते आणि तेथे कोणती स्थिती आकस्मिक मिळत नाही, तर जीवनाच्या सुरूवातीत त्याच्या कार्य-कारण नियमाला अस्विकार करून आपण त्याला आकस्मिक नाही काय मानत? आकस्मिकता कोणता सिद्धांत नाही, तर त्यात कार्य–कारण नियमातूनही नकार देणे होत आहे. ज्याच्याविना कोणतीही गोष्ट सिद्ध केली जाऊ शकत नाही.

जर असे म्हणू - आई-वडिलांचे शरिर जसे आपल्या अनुरुप मुलाच्या मनाला जन्म देते, तसेच त्यांचेही मत तद्नुरुप मुलाच्या मनाला जन्म देते, जरी काही अंशी ही गोष्ट ठिक वाटली तरी ही गोष्ट सर्वांशी ठिक वाटत नाही. जर असे असेल तर मंदबुद्धी माता-पितांना प्रतिभाशाली पुत्र आणि अशाच प्रतिभाशाली मात–पितांना मंदबुद्धी पुत्र उत्पन्न झाले नसते. पंडीतांची संतती बहुधा मुर्ख पाहिली जाते. हि संकटे टळून जातील तेव्हा आपण जीवन-प्रवाहाला या शरिराच्या पुर्व ओळखू. नंतर तर आपण म्हणू शकतो प्रत्येक एक पुर्व जीवन परिवर्ती जीवनाचे निर्माण करत आहे. ज्याप्रकारे खाणीतून निघालेले लोह, पिघळून बनलेले कच्चे लोह आणि अनेक वेळा थंड आणि गरम करून बनलेला पोलाद हे तीनही लोह आहेत. तरीही त्यात संस्काराची मात्रा जशी कमी अधिक आहे त्यानुसार आपण त्याला कमी अधिक प्रमाणात पाहतो.

प्रतिभाशाली मुलाची बुद्धी पोलादासारखी पुर्वीच्या अभ्यासाहून सुसंस्कृत आहे. मानसिक अभ्यासाचे तथापि स्मृतीच्या रुपात सर्वत्र उपस्थित राहणे अत्यावश्यक नाही, परंतु तद्नुसार न्युनाधिक संस्कृत तर बरेच गरजेचे आहे. या जन्मातही कॉलेज सोडल्यानंतर काही वर्षात पाठ्यपुस्तकातील पाठ केलेले बरेचसे नियम, सुत्र विसरले जातात. परंतु याचा अर्थ असा नाही की सर्व अभ्यासाचे परिश्रम व्यर्थ जाते. कच्च्या मडक्यात काही दिवस ठेऊन काढलेले, तुपासारखे विसरून गेल्यावरही जे विद्यार्जन संस्कार मनाच्या आत असतात, तेच शिक्षणाचे फळ आहे. कॉलेज सोडून वर्षो झाले असतील आणि शिकलेल्या गोष्टी विसरुन गेल्यावरही, जसे मनुष्याची मानसिक संस्कृती त्याच्या पुर्वीच्या विद्याभ्यासाला प्रमाणित करते तशाप्रकारे शैशवमध्ये झळकणाऱ्या प्रतिभाला का नाही पुर्वीच्या अभ्यासाचे परिणाम मानले जावे ?

वस्तुतः अनुवांशिकता आणि वातावरण मानसिक शक्तीच्या जितक्या अंशाच्या कारण नाही - आणि असे अंश बरेच आहेत. (मेधा विताम बुद्धीता, भद्रता - नृशंसता इ. कित्येक अपैतृक गुण मनुष्यात दिसून येतात.) याचे कारण याच्या पुर्वीच्या जीवन प्रवाहात शोधावे लागेल. एक तरूण मोठ्या तपश्चर्येने अध्ययन करून ज्या वेळी उत्तम श्रेणीत एम.ए. पास करतो, त्याचवेळी आपल्या पारितोषीक मिळाल्याविना त्याचे हे जीवन संपून जाते; त्याच्या या परिश्रमाला शरिराबरोबर विनष्ट झाले असे मानण्याशिवाय हे चांगले नाही का की, त्याला प्रतिभाशाली मुलासोबत जोडले जावे ? अपंडीत (अशिक्षित) माता-पितांची मुले असाधारण गणिततज्ञ, संगीततज्ञ पाहिले आहेत. उक्त क्रमाने आपणाला माहिती होते की आपल्या या शरिराचा जीवन-प्रवाह एका सुदीर्घ जीवन-प्रवाहा मधील एक छोटासा अंश आहे ज्याचा पुर्वकालीन प्रवाह चिरकालापासून येत आहे आणि पुढेही चिरकालापर्यंत राहील. चिरकाल आपण म्हणू

शकतो, कारण अनंतकाळ म्हणल्यावर अनंतकाळापासून संचित राशीत काही वर्षाचे संचित संस्कार कोणता विशेष प्रभाव ठेऊ शकत नाही, जसे समुद्रात एक छोटीशी मिश्रीची डली.

जीवनात आपण प्रवाह होताना पाहतो आणि व्यक्ती व समाज चांगले बनण्याची इच्छा ठेऊन तेव्हा प्रयत्न करू शकतो जेव्हा जिवनाच्या संस्कृतीला अनंतकाळापासून प्रयत्न नाही, परंतु एका परिमीत काळाच्या प्रयत्नाचा परिणाम माणू. वस्तुतः अनंत काळ आणि अकाल दोन्हीही भिन्न- भिन्न मानसिक संस्कृतीच्या भेदाला आकस्मिक बनवतात. जीवन-प्रवाह या शरिराच्या पुर्वीपासून येत आहे आणि मागेही राहिल, तरी अनादि आणि अनंत नाही. याची सुरुवात तृष्णा वा स्वार्थपरता पासून आहे. तृष्णेच्या अंताबरोबर याचा अंत होतो.

जीवन-प्रवाहाला या शरिराच्या पुर्वी आणि नंतर काळही मानल्यावर आपण मुर्खातील मुर्ख माणसाला चांगले बनण्याची आशा देऊ शकतो. कोणत्या उच्च आदर्शासाठी समाज वा दुसऱ्या व्यक्तीच्या उत्कर्षासाठी, तेव्हाच आपल्या जीवनाचा उत्सर्ग करुन देणाऱ्या पुरुषांची पर्याप्त संख्या मिळू शकते. तेव्हाच मनुष्य आपल्या चांगल्या-वाईट कर्माच्या दायित्वाला पुर्णपणे समजून दुसऱ्याच्या अपकारापासून (घातापासून) आपल्याला थांबवण्यासाठी तयार होऊ शकेल. समाजाच्या हितासाठी व्यक्तीला आत्मबलिदानासाठी तयार राहणे एवं समाजाने अपकार केल्यावर व्यक्तीचा आत्मा-निग्रह, या दोन्ही गोष्टी लोकांना चांगले बनविण्यासाठी अनिवार्यपणे आवश्यक आहेत. वस्तुतः लोकोन्नती या दोन्ही गोष्टींवर निर्भर आहे, याच शरिराला आदीम आणि अंतीम मानल्यावर त्या दोन्ही गोष्टींसाठी माणसाला प्रेरक वस्तूंचा अत्यंत अभाव जर नाही तर इतका अभाव जरुर होईल की ज्याच्यावर जाण्याची गती थांबली जाईल आणि फलतः पाठीमागे पडणे आरंभ होईल.

बुद्धाची शिकवण आणि दर्शन चार सिद्धांतांवर आधारीत आहे. पहिले तीन सिद्धांत बौद्ध धर्माला दुनियाच्या अन्य धर्मापासून वेगळे करतात. हे तीन सिद्धांत भौतिकवाद आणि बुद्ध धम्मात समान आहेत. परंतु चौथी बाब, अर्थात जीवन-प्रवाहाला या शरिरापर्यंत परिसिमीत न मानणे, यालाच भौतिकवादाहून वगळे करते आणि सोबतच व्यक्तीसाठी भविष्याला आशामय बनविण्याचे हे एक सुंदर उपाय आहे. ज्याच्याविना कोणत्याही आदर्शवादाचे कार्य रूपात रूपांतर होणे दुष्कर आहे.

चार सिद्धांतात पहिले तीन सिद्धांत मनुष्याला मोठ्या पारतंत्र्यातून मुक्त करतात. चौथे सिद्धांत आशामय भविष्याचा संदेश देते आणि शिल- सदाचारासाठीही उदाहरण बनते. या चारांचे ज्यात एकत्र संमलेन आहे तोच बुद्ध धम्म आहे.

**website : vinimaypublications.com**
वाचकांसाठी सूचना : कृपया ! आपले आप्तेष्ट, नातेवाईक तसेच मित्र-मैत्रिण यांना या वेबसाईट वरील पुस्तकांबद्दल माहिती द्या.